महाराष्ट्र शासन
पोलीस अधीक्षक (गुप्तवार्ता),
दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय,
'निश्चय' नवीन प्रशासकीय इमारत,
तुकाराम भिसाजी कदम मार्ग, भायखळा (पूर्व),
मुंबई - ४०० ०२७.
E-mail :- spdata.ats@mahapolice.gov.in

जा.क्र. १४५८/पो.अधी(गुप्तवार्ता)/दविप/म.रा./२०२६ — दिनांक ०५/१०/२०२६

प्रति,

मा. पोलीस महासंचालक,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**विषय :-** दहशतवाद विरोधी पथकाच्या आस्थापनेवर कंत्राटी पध्दतीने मंजूर करण्यात आलेले 'विधी सल्लागार-०१' व 'विधी अधिकारी-०१ (वर्ग-अ)' अशी ०२ रिक्त पदे भरण्याकरीता जाहिरात वेबसाईटवर प्रसिध्द करण्याबाबत.

**संदर्भ :-** शा.नि.क्र. अेपीओ-३६१४/प्र.क्र.९३/पोल-३, गृह विभाग, मुंबई दि. १६/०८/२०१९ व दिनांक २७/०१/२०२१.

**लक्षवेध:- पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक कार्यालय, मुंबई.**

महोदय,

उपरोक्त संदर्भित शासन निर्णयान्वये दहशतवाद विरोधी पथकाच्या आस्थापनेवर कंत्राटी पध्दतीने 'विधी सल्लागार-०१' व 'विधी अधिकारी-०१ (वर्ग-अ)' अशी ०२ पदे निर्माण करण्यात आलेली आहेत.

दहशतवाद विरोधी पथकाच्या आस्थापनेवरील 'विधी सल्लागार-०१' व 'विधी अधिकारी-०१ (वर्ग-अ)' अशी ०२ रिक्त पदे जाहिरातीद्वारे अर्ज मागवून भरणे आवश्यक आहे. सदरची जाहिरात **"APPLICATION FOR POST OF LEGAL ADVISER AND LAW OFFICER GRADE-A IN ATS"**/ "दहशतवाद विरोधी पथकामध्ये 'विधी सल्लागार' व 'विधी अधिकारी गट-अ' या पदाकरीता जाहिरात" या मथळयाखाली मा. पोलीस महासंचालक कार्यालयाचे अधिकृत पोर्टल **www.mahapolice.gov.in** वर प्रसिध्द करुन दिनांक २४/१०/२०२६ रोजी पर्यंत ठेवण्यात यावी, ही विनंती आहे.

आपला विश्वासू,

( अरविंद साळवे )
पोलीस उप महानिरीक्षक
अतिरिक्त कार्यभार
पोलीस अधीक्षक (गुप्तवार्ता)
दहशतवाद विरोधी पथक, म.राज्य, मुंबई

**सहपत्रे :-** जाहिरातीचा मसुदा व शासन निर्णयाची प्रत.

# <u>Educational Qualification, Age limit and Experience</u>

1) **Educational Qualification**: - The candidate should have a degree in Law from a recognized University and should possess valid Sanad.

2) **Experience: -** Experience for the post of 'Legal Adviser' minimum of 10 years practice and Law Officer Grade – A minimum of 7 years practice.

3) The candidate should also have thorough knowledge in subject of law regarding crime, services, administration and all type law and Departmental Enquiry proceedings, that he can handle legal subjects efficiently.

4) The candidate should have sufficient knowledge of Marathi, Hindi and English language.

5) **Age Limit:** - Age limit for both the post is 62 years as on ०५/१०/2026.

OR

6) A person during his service as Government servant had handled legal work directly and also any persons who has deep knowledge of law in Crime, Administration and Service Rules. Also, those persons who have knowledge of law equivalent to the orders issued by Hon'ble Supreme Court, his Govt. service shall be counted for experience. Appointment of such persons will be as per contract rules. Persons working as Government Servant are not entitled for appointment.

( Arvind Salve )
Deputy Inspector General of Police
Addl. Charge
Superintendent of Police
Anti Terrorism Squad,
Maharashtra State, Mumbai.

## Duties and Responsibilities:-

Duties and responsibilities for the of post of 'Legal Adviser' and 'Law Officer Grade-A' are mentioned below:

1) To give advice in all types of legal/ court matter received by the office and also handle court matters.

2) To give advices in all types of matters related to services/ administration/ departmental enquiry and equivalent law pertaining.to matters and also handle such matters.

3) To solve and dispose all types of pending matter related to court by approaching Govt. Pleader frequently and where the Govt. is respondent, to assist for proceedings and concerned officer for preparing an affidavit.

4) To prepare draft for an affidavit and after approval from the competent Officer to submit in the Court in stipulated time.

5) Where the Court had given a verdict against the Govt. In such case study the verdict of the Court and to take necessary action for preferring an appeal in the Court.

6) If the decision has been taken for preferring an appeal, to prepare the draft for the appeal and after getting approval file in the Court and co-ordinate with the Govt. Pleader up to final order.

7) The entrusted legal matters should be disposed off within a stipulated time.

8) To help the Investigation Officer in filling of First Information Report.

**( Arvind Salve )**
Deputy Inspector General of Police
Addl. Charge
Superintendent of Police
Anti Terrorism Squad,
Maharashtra State, Mumbai.

## Terms and conditions:

1) Those who are appointed for this post shall be on contract basis only. They won't be treated as Govt. Officer / Employee.

2) Candidates will undergo a written examination prior to the interview for the appointment to the post of 'Legal Advisor' and 'Law Officer Grade-A' on a contract basis.

3) Appointment of candidate shall be made on the basis of written exam and interview. Date of exam /Interview shall be intimated to eligible candidates later.

4) Since the appointment is on contract basis, it will be valid for 11 months only.

5) During the period of the contract for eleven months, the candidate shall not take any private work/ profession without written permission of the authority. If the candidate is denied such permission by the authority and then the candidate kept on with his private work/ profession and such private work/ profession causing obstruction or making financial losses to the Govt. then appointment of such candidates will be cancelled and he will also be liable for legal actions.

6) Candidate shall not be paid any Travelling Allowances for the interview.

7) Appointed candidate is bound to sign an Agreement issued by this office.

8) The candidates appointed on contract basis will not be paid any other expenses apart from monthly contract amount.

9) The candidate should fulfill educational qualification, age limit and experience as mentioned above as on 24./10/2026. Applications received without signature or attested copies of documents will not be entertained.

10) It is compulsory for the incumbent to give minimum 30 hrs. every week for legal advice in matters pertaining to this office.

11) Incomplete application will not be considered.

**( Arvind Salve )**
Deputy Inspector General of Police
Addl. Charge
Superintendent of Police
Anti Terrorism Squad,
Maharashtra State, Mumbai.

# Application Form

## Application for the post of Legal Adviser/ Law Officer Grade-A

| For office use only | Affix one signed photograph and enclose another signed photograph along with application in the envelop |
|---|---|
| 1. Application No. ☐☐☐☐☐☐☐ | |
| 2. Date of receipt of Application ☐☐ ☐☐ ☐☐☐☐ | |
| 3. Receiver's Signature | |

**Note:- Number in the application Form should be mentioned in English**

### A) Candidate Personal Information

1. Full Name :- Surname Name Fathers/ Mothers Name

Marathi : ______________________________

# English : ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐

2. Address for correspondence :- ______________________________

Taluka: ____________ District: ____________ Pin Code ☐☐☐☐☐☐

3. Permanent Address :- ______________________________

Taluka: ____________ District: ____________ Pin Code ☐☐☐☐☐☐

4. a. Telephone No.:- Landline ____________ Mobile No. ____________

b. email i.d.:- --------------------------------------------------

5. Date of Birth:- ☐☐ ☐☐ ☐☐☐☐

Day Month Year Place of Birth ____________

6. Age as on 05/10/2026 :- ☐☐ ☐☐ ☐☐☐☐

Day Month Year

7. Sex :- Male ☐ / Female ☐

8. Religion :- ____________ Caste :- ____________

9. Domiciled in the State of Maharashtra:- Yes ☐ / No ☐

Tick ( √ ) where it is proper/-

## B) Candidates Educational Information

10. Educational Qualification

| Education | Name of the educational institute (school/colleges) | Board/ University | Year of Passing | Marks Obtained | Percentage obtained |
|---|---|---|---|---|---|
| 1. S.S.C (10th) / Old 11th | | | | | |
| 2. H.S.C. | | | | | |
| 3. Degree | | | | | |
| 4. Law Degree | | | | | |

11. Other Educational Qualification

Whether trained in Computer: - Yes ☐ / No ☐

12. Other details of the Applicant:

A) Date of receipt of Sanad and Number:-

B) Details of cases personally handled by candidates/ Applicant: -

| Sr. No. | Name of the Court | Type of cases | No. of cases |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| | | | |

*** Note: - Experience certificate in the profession of Lawyer is required.**

| | | |
|---|---|---|
| 13 A) | Whether the candidate / Applicant ever been arrested/ detained /held/fined/ remanded against any crime or whether candidate ever been rejected/not eligible from appearing examination/ Selection held by M.P.S.C. whether the candidate has been debarred from appearing examination held by University/Educational Institutions/Trust. | Yes ☐<br>No ☐ |

| | | |
|---|---|---|
| 13 B) | While filing the form the candidate should mentioned whether there are any cases against him in Court/University/Any other educational Institution/Trust | Yes ☐<br>No ☐ |

(If the answer is yes for13A or 13B, the candidate should mention the detail of the case/ arrest/ detention/ fine/ conviction/ remand etc. and also should furnish the detail of pending cases at Court/ University/ Educational Institutions/ trust till date.)

## Declaration to be submitted by the Applicant

I Shri. / Smt./ Kum. ________________________________ hereby solemnly declare that, the above information furnished by me is true to the best of my knowledge. I am eligible to the post as per the terms and conditions and educational qualification as mentioned in advertisement. I have no objection if the details submitted by me in the application found to be false and that my application is rejected during selection/ appointment. I shall be solely responsible for wrong/ false information furnished by me in the application and I shall be liable for legal proceedings against me. I am liable to be unfit if any type of recommendation or undo advantage is found taken by me during the selection process.

Place :-

Date :-

Applicant's Signature

(With date)

**Enclosed:** - Attested Photo/ Xerox copy of all the necessary certificate/ documents.

अपर पोलीस महासंचालक, दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांच्या आस्थापनेवर विधी सल्लागार-०१ व विधी अधिकारी-०१ (वर्ग-अ) अशी ०२ काल्पनिक पदे निर्माण करून ती बाह्य यंत्रणेमार्फत भरण्यास मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांकः अेपीओ-३६१४/प्र.क्र.९३/पोल-३
मंत्रालय, दुसरा मजला, मुख्य इमारत,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई
दिनांक : १६ ऑगस्ट, २०१९

<u>वाचा :-</u>

१) वित्त विभाग, शासन निर्णय क्र.पदनि-२०१८/प्र.क्र११३/आ.पु.क.,दि.११.१२.२०१८.
२) गृह विभाग, शासन निर्णय क्र.डीपीपी-२०१४/प्र.क्र.०७/पोल-१०, दि.२१.०८.२०१८.
३) अपर पोलीस महासंचालक(नि.व स.),पोलीस महासंचालक कार्यालय,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/२६-ब/वि.अ/दविप/२९/२०१५, दि.१७.११.२०१८
४) अवर सचिव (आपुक),वित्त विभाग यांचे पत्र क्र.पदनि२०१९/प्र.क्र.४५/आपुक,दि.१२.०६.२०१९.

<u>प्रस्तावना :-</u>

दहशतवाद विरोधी पथकामध्ये नोंद केल्या जात असलेल्या जास्तीत जास्त गुन्ह्यांमध्ये MCOCA UAPA Arms Act, Explosive Substance Act, Explosive Act इत्यादी सारख्या महत्वाच्या कायदयातील तरतुदींचा वापर केला जातो. दहशतवाद विरोधी पथकात नोंद झालेल्या गुन्ह्यांचा तपास प्रत्येक पायरींवर शास्त्रशुद्धरितीने व कायदेशिररित्या करुन, गुन्ह्यांचा तपास मुदतीत पुर्ण करुन, न्यायालयात दोषारोपपत्र सादर करुन आरोपींना जास्तीत जास्त शिक्षा होण्यासाठी तपासी अधिकाऱ्यास वेळोवेळी कायदेविषयक मार्गदर्शन आवश्यक असते. विधी अधिकारी/विधी सल्लागार यांचेकडून गुन्ह्याचे तपासासंदर्भात प्राथमिक बाबींची पुर्तता करणेसंदर्भात सल्ला घेणे आवश्यक असते. तसेच मा.न्यायालयात गुन्ह्याचे दोषारोपपत्र दाखल झाल्यानंतर खटला चालविण्यासाठी निष्णात अभियोक्त्यांची नितांत आवश्यकता असते. काहीवेळा आरोपपत्र दाखल करण्यापुर्वी सुद्धा आरोपींच्या जामीन अर्जासंदर्भात अथवा जेव्हा कायदयाचा अर्थ लावण्याचा प्रश्न येतो अशा वेळी सुद्धा अनुभवी/निष्णात अभियोक्त्यांची आवश्यकता भासते. न्यायालयात शासनाची बाजु प्रभावीपणे

मांडणे तसेच गुन्हा दाखल झाल्यापासून ते मा.न्यायालयात गुन्ह्याचे दोषारोपपत्र दाखल करेपर्यंतच्या विधी विषयक मार्गदर्शनाची वेळोवेळी आवश्यकता भासते. त्यामध्ये मुख्यत्वेकरुन अटक आरोपींच्या अंतरिम जामीन अर्जाचे सुनावणीचे वेळी, MCOCA, UAPA इ. कायद्यातील तरतुदी लागु करताना निष्णात विधी सल्लागाराची गरज भासते.

२. उपरोक्त संदर्भ क्र.३ येथील दि.१७.११.२०१८ रोजीच्या पत्रान्वये अपर पोलीस महासंचालक, दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार अपर पोलीस महासंचालक, दहशतवाद विरोधी पथक यांच्या आस्थापनेवर ०१-विधी सल्लागार, ०१-विधी अधिकारी (वर्ग-अ) अशी एकुण ०२ काल्पनिक पदे निर्माण करून सदर पदे बाह्ययंत्रणेव्दारे भरण्यास मान्यता देण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती .याअनुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णयः-

अपर पोलीस महासंचालक, दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांच्या आस्थापनेवर विधी सल्लागार-०१ व विधी अधिकारी-०१ (वर्ग-अ) अशी ०२ काल्पनिक पदे निर्माण करण्यास व सदर पदे बाह्ययंत्रणेमार्फत भरण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. नव्याने निर्माण केलेली पदे बाह्ययंत्रणेमार्फत ११ महिन्यासाठी भरताना विधी सल्लागार या पदासाठी मासिक दरमहा मानधन रू.४०,००० प्रमाणे ११ महिन्याकरिता रू.४,४०,०००/- व विधी अधिकारी-०१ (वर्ग-अ) या पदासाठी मासिक दरमहा मानधन रू.३५,००० प्रमाणे ११ महिन्याकरिता रू.३,८५,०००/- इतके मानधन मंजूर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३. उपरोक्त विधी सल्लागार व विधी अधिकारी (वर्ग-अ) पदे ही बाह्ययंत्रणेमार्फत(Outsourcing) भरावयाची आहेत. केवळ वय, आवश्यक शैक्षणिक अहर्ता,अनुभव,कर्तव्य व जबाबदा-या या गृह विभाग, शासन निर्णय क्र.एसपीपी-२००५/प्र.क्र.२४७/पोल-१०, परिशिष्ट “अ” प्रमाणे असतील.

४. सदरची पदे बाह्ययंत्रणेव्दारे भरण्याची कार्यवाही अपर पोलीस महासंचालक,दहशतवाद विरोधी पथक यांनी करावी. सदर पदे फक्त एक वर्षासाठी राहतील.

५. सदर शासन निर्णय वित्त विभाग शासन निर्णय क्र. पदनि-२०१८/प्र.क्र११३/आ.पु.क.,दि.११.१२.२०१८ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार व काल्पनिक पदे निर्माण करण्यास व रिक्त पदे भरण्याकरिता मान्यता देण्याकरिता गठीत केलेल्या उप समितीच्या दि.०६.०६.२०१९ रोजी झालेल्या बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८१६१२५४०५२०२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dinesh Appaji Saste

Digitally signed by Dinesh Appaji Saste
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, [illegible], cn=Dinesh Appaji Saste
Date: 2019.08.16 13:01:03 +05'30'

(दिनेश सस्ते)

कार्यासन अधिकारी, गृह विभाग

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
२. मा.राज्यमंत्री,गृह (शहरे) यांचे खाजगी सचिव.
३. मा.राज्यमंत्री,गृह(ग्रामीण) यांचे खाजगी सचिव.
४. अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७. प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. अपर पोलीस महासंचालक, दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
९. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा),महाराष्ट्र-१,मुंबई.
१०.अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई.
११.जिल्हा कोषागार अधिकारी,मुंबई.
१२.निवासी लेखा परीक्षा अधिकारी,वांद्रे,मुंबई.
१३.निवड नस्ती, पोल-३.

अपर पोलीस महासंचालक, दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या आस्थापनेवर विधी सल्लागार-०१ व विधी अधिकारी-०१ (वर्ग-अ) अशी ०२ काल्पनिक पदे निर्माण करून ती बाह्य यंत्रणेमार्फत भरण्यास मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन शुध्दीपत्रक क्रमांकः अेपीओ-३६१४/प्र.क्र.९३/पोल-३
मंत्रालय, दुसरा मजला, मुख्य इमारत,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : २७ जानेवारी, २०२१

वाचा :-

१) गृह विभाग, शासन निर्णय क्र.अेपीओ-३६१४/प्र.क्र.९३/पोल-३, दि.१६.०८.२०१९.

२) अपर पोलीस महासंचालक(नि.व स.),पोलीस महासंचालक कार्यालय,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/२६-ब/वि.अ/दविप/२९/२०१५, दि.१३.११.२०२०.

शासन शुध्दीपत्रक :-

उपरोक्त संदर्भाधिन क्र.०१ येथे नमूद दिनांक १६.०८.२०१९ रोजीच्या शासन निर्णयातील परिच्छेद ४ मधील " सदर पदे फक्त एक वर्षासाठी राहतील" याऐवजी "सदर नेमणुका या बाह्ययंत्रणेव्दारे प्रथमत: ११ महिन्यांसाठी करण्यात याव्यात. ११ महिन्यानंतर आवश्यक असल्यास करारनाम्याची मुदत वेळोवेळी वाढविता येईल. तथापि, अशी मुदत वाढविताना एकावेळी ही मुदत ११ महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही याची काळजी नियुक्ती प्राधिकारी घेईल. अशा प्रकारे जास्तीत जास्त ३ वेळा नियुक्ती करता येईल. त्यानंतर अशा उमेदवारांची पुनश्च: नियुक्ती करणे आवश्यक आहे असे सक्षम प्राधिका-याचे मत झाल्यास त्या उमेदवारास पुनश्च: निवड प्रक्रियेस सामोरे जावे लागेल" असे वाचण्यात यावे.

२. सदर शासन शुध्दीपत्रकं महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२१०१२९१७३२३०३०२९ असा आहे. हे शुध्दीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rupali Sanjog Kabare

Digitally signed by Rupali Sanjog Kabare
Date: 2021.01.29 17:35:56 +05'30'

( रूपाली कबरे )
कार्यासन अधिकारी, गृह विभाग

प्रत,

१. मा.मंत्री,गृह यांचे खाजगी सचिव.

२. मा.राज्यमंत्री,गृह (शहरे) यांचे खाजगी सचिव.

३. मा.राज्यमंत्री,गृह (ग्रामीण) यांचे खाजगी सचिव.
४. अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७. प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. अपर पोलीस महासंचालक, दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
९. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा),महाराष्ट्र-१,मुंबई.
१०.अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई.
११.जिल्हा कोषागार अधिकारी,मुंबई.
१२.निवासी लेखा परीक्षा अधिकारी,वांद्रे,मुंबई.
१३.निवड नस्ती, पोल-३.